ePaper मेरे नाद में मत लग, एक भाकर खाकर झोप... : मनोज जरांगे

| वर्ष - 7 । अंक - 211 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत
- दक्षिण आफ्रिकेचा पेपर सोपा नाहीच!
- खामकरच्या पोस्टनं वेधलं लक्ष
- रेपो रेट 6.5 टक्क्यांवर कायम
- मलिक प्रकरणात मनसेची उडी!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 9 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# 'फायर कँडल' कंपनीत भीषण आग
# सहाजणांचा होरपळून मृत्यू!

## अनधिकृत कंपन्यांचा प्रश्न ऐरणीवर :




। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये मोठी आग लागलेली आहे. तळवडे येथे केकवरील वरील फायर कँडल बनवणाऱ्या कारखान्यात ही आग लागली आहे. या भीषण आगीत सहा जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**



या आगीत आणखी काही कामगार अडकल्याचे म्हटलं जात आहे. तळवडे येथील कारखान्यात ही आग लागली असून ती विनापरवाना सुरू होती.

दुपारी ३ वाजता लागलेल्या या आगीवर अग्निशमन दलाचे जवान नियंत्रण मिळवले आहे. दुसरीकडे सात ते आठ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल आहेत. आत्तापर्यंत सहा मृतदेह बाहेर काढण्यात आलेल्या आहेत, आणखी कामगारांचा शोध सुरु असून जखमींना रुग्णालयात हलवले आहे.

मृत्यू झालेले सर्व कामगार हे केकवरील वरील फायर कँडल बनवणाऱ्या कारखान्यात काम करत होते. या घटनेनंतर काही कालावधीतच महापालिका आयुक्त शेखर सिंह घटनास्थळी दाखल झाले आहेत. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, याआगीत सहा जणांचा मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. जे जखमी कामगार आहेत त्यांना वायसीएम तसेच ससून रुग्णालयात उपचाराकरिता हलवण्यात आलं आहे.

> तळवडे येथील जोतिबा मंदिराजवळील कंपनीला भीषण आग लागली आहे. यामध्ये १५ महिला कामगार अडकल्या. आठ ते दहा महिला मृत झाल्याचे वृत्त समजले आहे. ही अत्यंत हृदयद्रावक घटना आहे. मृत कामगारांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पिंपरी-चिंचवडच्या उद्योग क्षेत्रासाठी हा काळा दिवस म्हणावा लागेल. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कंपन्यांमध्ये प्रशासनाने तातडीने सुरक्षा ऑडिट करावे. अशा घटनांचा पुनरावृत्ती होवू नये. याकरिता कामगारांमध्ये जागृती करण्याची आवश्यकता आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

> पिंपरी-चिंचवडमधील तळवडे येथील 'फायर कँडल' तयार करणाऱ्या एका कारखान्याला भीषण आग लागली. या दुर्घटनेमध्ये काही नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी असून मृत बांधवांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच जखमी नागरिकांच्या प्रकृतीमध्ये लवकरात लवकर सुधारणा व्हावी, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. प्रशासनाने शहरातील छोट्या कंपन्या, व्यावसायिक अस्थापनांचे सुरक्षा ऑडिट करावे.
>
> **-शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवड: क्रीडा शिक्षकांच्या हातात निवडणूक कामांचा भार!

## खेळाडू घडविण्याची जबाबदारी आठ क्रीडा शिक्षकांवर

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापलिकेच्या 105 शाळांमधील खेळाडू घडविण्याचा भार केवळ आठ क्रीडा शिक्षकांवर आहेत. नवीन क्रीडा शिक्षक भरतीला मुहूर्त न मिळाल्याने ही स्थिती आहे. तर सध्या नियुक्त असलेल्या क्रीडा शिक्षकांना निवडणूक आणि इतर कामे दिली जात असल्याने शहरात दर्जेदार खेळाडू घडणार कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे. विविध क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकांवर नाव कोरण्याचे स्वप्न अनेक जण पाहतात. त्यासाठी आवश्यक साधनसामग्री आणि सुविधा देखील मिळणे गरजेचे आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष होत असल्यचे चित्र पिंपरी-चिंचवड महापालिकेअंतर्गत दिसत आहे. विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पुरेसे क्रीडा साहित्य उपलब्ध नसल्याच्या सातत्याने तक्रारी येत आहेत. परिणामी शाळांमध्ये खेळाडू घडविण्यात अडचणी येत आहेत. पिंपरी चिंचवड महापलिकेच्या 22 शाळांना मैदान नाही तसेच 17 शाळांची मैदाने अपुरी असल्याने विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. महापालिका शाळेत असलेल्या क्रीडा शिक्षकांना इतर कामे लावली जातात तसेच क्रीडा शिक्षक कमी असताना क्रीडा शिक्षक निवृत्तीनंतर पद भरत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. शिक्षकांची पद भरली केली जात नसल्याने क्रीडा विकासाला खीळ बसत आहे. अनेक शाळांना पुरेसे मैदान नाही.

### एकूण 15 क्रीडा शिक्षकांची प्रतिक्षा...

पिंपरी-चिंचवड महापालिका क्रीडा विभागांतर्गत एकूण 23 क्रीडा शिक्षकांचा समावेश आहे. मात्र या पैकी 15 शिक्षकांना निवडणूकीच्या कामाचा भार दिला आहे. परिणामी उर्वरीत केवळ आठ क्रीडा शिक्षकांवर विद्यार्थ्यांना घडविण्याची वेळ आली आहे. हे क्रीडा शिक्षक पुन्हा क्रीडा विभागाकडे वर्ग करण्याची मागणी विभागाने केली आहे. मात्र त्या बदल्यात इतर



कर्मचारी देण्याचे पत्र निवडणूक विभागाने महापालिका प्रशासनाला दिले आहे. त्यामुळे हे क्रीडा शिक्षक पुन्हा विभागाकडे कधी येणार असा प्रश्न आहे.

# सत्तेत सहभागी झाल्यावर मलिकांचा जामीन!

## सुषमा अंधारे यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवाब मलिक यांचा राजीनामा घ्यावा, अशी महाविकास आघाडीकडे मागणी करणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संजय राठोड यांचा राजीनामा का घेतला नाही. मलिक अल्पसंख्यांक असल्यामुळे फडणवीस यांची भूमिका बदलली का, अशी विचारणा ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी येथे शुक्रवारी केली.**

भ्रष्टाचाराचे आरोप असलेले नवाब मलिक यांनी अजित पवार गटाला समर्थन दिल्याचे विधिमंडळाच्या अधिवेशनात दिसून आले होते. त्याचे तीव्र राजकीय पडसाद उमटले. त्यानंतर सत्तेपेक्षा देश महत्त्वाचा आहे. त्यामुळे महायुतीमध्ये मलिक नकोत, असे पत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना दिले. या पार्श्वभूमीवर अंधारे यांनी पत्रकार परिषदेत फडणवीस यांच्यावर टीका केली. फडणवीस यांना उशिरा विवेकवाद कसा आठवला, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. अजित पवार आणि नवाब मलिक यांच्यामध्ये दोन ते तीन भेटी झाल्या होत्या. मात्र मलिक यांचा विषय काढण्यामागील राजकारण वेगळे आहे. अधिवेशनात मराठा आरक्षण, धनगर आरक्षणावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे. मात्र मलिक प्रकरणावर पुढील तीन ते चार दिवस चर्चा होईल. सत्तेपेक्षा देश मोठा, हा विवेकवाद फडणवीस यांना उशिरा सुचला आहे. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रिफ यांची निर्दोष मुक्तता झालेली नाही. तरीही ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर आहेत. मनोज कंबोजसारखी व्यक्ती पुढे केली जाते. त्यावेळी फडणवीस यांचा विवेकवाद कुठे जातो, अशी टीका अंधारे यांनी केली. ससूनमधील अमली पदार्थ तस्करी प्रकरणी काहींना अटक झाली आहे. कारागृहातून या अवैध कृतीला बळ दिले जात होते. त्यामुळे कारागृह निरीक्षक, महानिरीक्षक यांच्यावर सरकारने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. संदर्भात उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadanvis) यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना (Ajit Pawar) पत्र लिहिलं. त्यानंतर राजकीय वर्तुळात एकच खबळ माजल्याचं पाहायला मिळालं. याच संदर्भात ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी फडणवीसांवर हल्लाबोल केला. मलिक अल्पसंख्यांक असल्यामुळे ही भूमिका घेतली का असा सवाल सुषमा अंधारे (Sushma Andhare) यांनी उपस्थित केलाय. हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली यामध्ये जनतेच्या प्रश्नावर चर्चा होईल अशी अपेक्षा होती, पण चर्चा मात्र वेगळ्याच विषयाकडे वळवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची प्रतिक्रिया सुषमा अंधारे यांनी दिलीये.





नवाब मलिक अजित पवारांच्या दोन तीन गाठीभेटी झाल्या आहेत, त्यावेळी मालिकांनी पाठिंबा जाहीर केलाय. सत्तेत सहभागी झाल्यावर मालिकांचा जामीन झाला आहे, हे विशेष आहे असा आरोप देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. मालिकांचा राजीनामा घेतला नाही असं आमच्यावर आरोप करणाऱ्या फडणवीसांनी संजय राठोड यांचा राजीनामा घेतला का असा सवाल देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. वाब मलिक अल्पसंख्याक आहे म्हणून काल हा विषय काढण्यात आला का असा घणाघाती प्रश्न सुषमा अंधारेंनी उपस्थित केलाय. काल हा विषय काढण्यामागे राजकारण वेगळं आहे. आता पुढील तीन दिवस अधिवेशनात याच मुद्द्यावर चर्चा केली जाणार. कोट्यावधी रुपये खर्च करुन अधिवेशन पार पडत असतं. त्यामुळे मराठा आरक्षण, धनगर आरक्षण यावर चर्चा होण्याची गरज होती, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. तेपेक्षा देश मोठा हा विवेकवाद फडणवीस यांना उशीरा का सुचला. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल पटेल, मुश्रीफ यांची निर्दोष मुक्तता झाली आहे का? तरी ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर कसे?कंबोज सारखा आरोपी माणूस बोलायला पुढे करता. तुमचा विवेकवाद कुठे गेला असा प्रश्न उपस्थित करत सुषमा अंधारे यांनी फडणवीसांवर टीकास्त्र सोडलं. मरसाळे, देवकाते अटक झाली. यातला एकही प्रमुख नाही. ठाकूरही शेवटची कडी नाही. कारागृहातून या गोष्टी चालतात. कारागृह निरिक्षक, महानिरीक्षक यांच्यावर काय कारवाई करणार हे सांगावे. तसेच ड्रग्सचं नेक्सस कधी बाहेर येणार आहे याबाबत देखील माहिती द्यावी, अशी प्रतिक्रिया सुषमा अंधारेंनी दिली. अनिक्षा जयसिंघानि प्रकरणात अमृता फडवणीस यांची चौकशी लावणार का? असा सावल देखील यावेळी सुषमा अंधारे यांनी उपस्थित केलाय.

### नेक्सस कधी बाहेर येणार आहे?

सत्तेत सहभागी झाल्यावर मालिकांचा जामीन झाला आहे, हे विशेष आहे असा आरोप देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. मालिकांचा राजीनामा घेतला नाही असं आमच्यावर आरोप करणाऱ्या फडणवीसांनी संजय राठोड यांचा राजीनामा घेतला का असा सवाल देखील सुषमा अंधारे यांनी केलाय. वाब मलिक अल्पसंख्याक आहे म्हणून काल हा विषय काढण्यात आला का असा घणाघाती प्रश्न सुषमा अंधारेंनी उपस्थित केलाय. देश मोठा हा विवेकवाद फडणवीस यांना उशीरा का सुचला. भावना गवळी, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, प्रफुल पटेल, मुश्रीफ यांची निर्दोष मुक्तता झाली आहे का? तरी ते सत्तेत महत्त्वाच्या पदावर कसे?कंबोज सारखा आरोपी माणूस बोलायला पुढे करता.

# तळवडे आगप्रकरणाची चौकशी करा!

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी चौकशीची मागणी केली आहे. तसेच प्रशासनाच्या कारभारावर शंका व्यक्त केली आहे. यावेळी माजी नगरसेवक पंकज भालेकर, प्रवीण भालेकर राष्ट्रवादी पदाधिकारी उपस्थित होते. शहराध्य गव्हाणे यांनी घटनास्थळी भेट दिली. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांनी तळवडे येथील आगीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या प्रशासनास सूचना दिल्या आहेत.**



दरम्यान, या पार्श्वभूमिवर महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागलीय. तळवडे येथील फटाक्याच्या दुकानाला लागलेल्या आगीत कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. कंपन्यांच्या ऑडिटकडे महापालिका प्रशासनाचे अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे अशा घटनांमध्ये वाढ होत असून तळवडेतील आगीप्रकरणी जबाबदार धरून महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जोर धरू लागली असताना उपमुख्यंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी या संदर्भात तळवडे येथील आगीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल,असे एक्सवर म्हटले आहे.

या बाबत ट्विट द्वारे अजित पवार यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडमधील तळवडे येथे केकवरील फायर कँडल बनवण्याच्या कारखान्याला लागलेल्या आगीत सात जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. मी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करतो. दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबीयांबद्दल सहसंवेदना व्यक्त करतो. जखमींवर उपचार सुरु असून त्यांना लवकरात लवकर बरं वाटेल अशी प्रार्थना करतो.

या घटनेची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल तसंच दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी पूर्ण उपाययोजना केल्या जातील, असे अजित पवार यांनी ट्विट केले आहे.

### महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

तळवडे आगप्रकरणी घटनास्थळाला राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी भेट दिली. मृतांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई द्यावी, तसेच जखमींच्या उपचाराचा खर्च देण्यात यावा. अशी मागणी करत महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.


# पुनावळे कचरा डेपो स्थलांतरासाठी राष्ट्रवादी आक्रमक!

» शहराध्यक्ष तुषार कामठे यांचे महापालिकेसमोर उपोषण

» महापालिका प्रशासनाच्या भाजपा आमदारांसमोर पायघड्या

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो स्थलांतरित करण्यासाठी खा. शरद पवार यांची राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. कचरा डेपोच्या निर्मितीला विरोध दर्शविण्यासाठी शहराध्यक्ष कामठे यांच्या नेतृत्वात महापालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. पुनावळे कचरा डेपोच्या निर्मितीला विरोध करणाऱ्या नागरिकांनी या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केले आहे. तर महापालिका प्रशासन भाजपाच्या आमदारांच्या नातेवाईकांना पाठीशी घालत असल्याचा आरोप कामठे यांनी केला आहे.**



गेल्या काही दिवसांपासून पुनावळे कचरा डेपोला विरोध करण्यासाठी सातत्याने आंदोलने, जनजागृती आणि निवेदने दिली जात आहेत. या लढाईत आता खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने देखील उडी घेतली आहे. नियोजित कचरा डेपोला विरोध करत राष्ट्रवादीने आपली भूमिका मांडली आहे. नुकतेच महापालिकेकडून मोशी येथील कचरा डेपो मध्ये वेस्ट एनर्जी या प्रोजेक्टसाठी 350 कोटी रुपयांच्या निविदा मागवण्यात आल्या होत्या. या प्रकल्पाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले होते. त्यावेळी या प्रोजेक्टची 1 हजार 500 टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असल्याचे सांगून मोदींनी कौतुक केले होते. सध्या शहरांमध्ये 1 हजार 300 टन कचरा दिवसाला संकलित होत आहे. याचा अर्थ 200 टन कचऱ्यावर अजून प्रक्रिया होऊ शकते, असे मत कामठे यांनी मांडले आहे.

काही महिन्यापूर्वी महापालिकेने 47 कोटी रुपये खर्चून 8 लाख घनमीटर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी मोशी कचरा डेपोमध्ये जैव खनन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची अंमलबजावणी करण्यासाठी कंत्राट देण्याकरिता निविदा मागवल्या होत्या. तसेच प्रस्तावित जैव खनन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 125 कोटी खर्चून 14 लाख घनमीटर कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी निविदा पूर्व प्रक्रिया राबवत आहेत. मोशी कचरा डेपोमध्ये हे प्रकल्प महापालिका राबवत असताना पुनावळे येथे नवीन कचरा डेपो तयार करण्याचा आग्रह का धरत आहे, असा सवाल कामठे यांनी उपस्थित केला आहे. हा भूखंड कचरा डेपोसाठी आरक्षित असताना देखील महापालिकेने 2010 पासून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम केली. सध्या या ठिकाणी 10 ते 14 वर्षांची झाडे चांगल्या प्रमाणात वाढलेली आढळून येतात. या झाडांची कचरा डेपोसाठी कत्तल करण्याची वेळ येणार आहे. या भूखंडावरील काही झाडांचे गडचिरोली येथे पुर्नरोपण करण्यात येणार आहे. त्यासाठी गडचिरोली येथे जागा खरेदी करणे तसेच येथील वृक्षांची गडचिरोली येथे वाहतुकीचा खर्च आणि तेथे पुर्नरोपणाचा खर्च हा महापालिकेला करावा लागणार आहे. मुंबई आणि दिल्लीप्रमाणे भविष्यात पिंपरी चिंचवड शहराला देखील वायु प्रदूषणाच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे सदर कचरा डेपोच्या जागावर महापालिकेने ऑक्सिजन पार्क तयार करावे. यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील हवा शुद्ध होण्यास मदत होईल. पर्यायी महापालिकेने आज पर्यंत वृक्षारोपणावर केलेला खर्च वाया जाणार नाही, असा पर्याय कामठे यांनी सूचविला आहे.

## आयटी कंपन्यांच्या स्थलांतराची भीती...

» हिंजवडी येथील साखर कारखान्याचे भूमिपूजन होऊन देखील राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी प्रास्तावित साखर कारखाना जवळच्या कासारसाई येथे स्थलांतरित केला होता. त्यानंतर दूरदृष्टी ठेवून हिंजवडी येथे आयटी पार्क उभारण्यात आले. यामुळे देशभरातील लाखो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. तसेच आयटी पार्कच्या आजूबाजूच्या भागात जमिनीच्या किंमती वाढल्याने स्थानिक ग्रामस्थांना देखील त्याचा फायदा झाला. अनेक चाकरमान्यांनी कर्ज घेऊन या ठिकाणी सदनिका घेतल्या. प्रस्तावित कचरा डेपो तयार झाल्यास हिंजवडी आयटी पार्क मधून बऱ्याचशा कंपन्या स्थलांतरित होतील. त्याचा थेट परिणाम या भागातील अर्थकारणावर होणार आहे.

## 'नो डेव्हलपमेंट झोन' का नाही केला ?

**»शहराचा विकास आराखडा मंजूर करत असताना 2008 मध्ये पुनावळे येथील कचरा डेपोसाठी 65 एकरचा भूखंड आरक्षित केला होता. त्यानंतर या भूखंडाच्या 500 मीटर परिघात नो डेव्हलपमेंट झोन तयार करायला हवा होता. तो का केला नाही असा सवाल राष्ट्रवादीने उपस्थित केला. परंतु महापालिकेने या आरक्षित भूखंडाच्या आजूबाजूच्या भागात मोठ्या आणि लहान बिल्डरांना निवासी आणि व्यावसायिक इमारती बांधण्यासाठी बांधकाम परवानगी दिली. परिणामी पुनावळे, ताथवडे, वाकड आणि महापालिका हद्दीतील इतर भागांमध्ये तसेच हिंजवडी, मामुर्डी या शेजारील गावामध्ये आरक्षित भूखंडा भोवती मोठ्या प्रमाणात निवासी प्रकल्प उभे राहिले आहेत.**

---

# 'हॉर्स रायडिंग' प्रकरणी सोसायटी फेडरेशन आक्रमक

## » संभ्रम निर्माण करण्यांपासून सावध रहा; आमचा विरोध कृतीतून दाखवू : संजीवन सांगळे

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी चौकातील खेळाचे आरक्षित मैदान हॉर्स रायडिंगसाठी खासगी संस्थेस भाडेतत्त्वावर देण्यास चिखली- मोशी -पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचा सुरुवातीपासून तीव्र विरोधच आहे. मात्र, काही लोक फेडरेशनच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यापासून सदनिकाधारकांनी सावध रहावे. आम्ही आमचा विरोध आणि काम कृतीतून दाखवू दाखवू, असे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केले आहे.**

संजीवन सांगळे म्हणाले की, चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी जवळील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे खेळासाठी आरक्षित मैदान हॉर्स रायडिंगसाठी एका खासगी संस्थेला भाडेतत्त्वावर देण्यास पूर्वीपासून तीव्र विरोधच होता. याबाबत आमच्या फेडरेशन मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या बरोबर पत्रव्यवहार केला होता. मागील दोन दिवसापासून काही राजकीय पक्षांच्या मंडळींकडून हे मैदान पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून एका खासगी संस्थेला हॉर्स रायडिंगसाठी देण्याच्या फेडरेशनच्या भूमिकेबाबत आमच्या सोसायटी सदस्यांच्यामध्ये राजकीय हेतूने प्रेरित होऊन मुद्दाम संभ्रम निर्माण करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आमच्या फेडरेशनची पूर्वीपासूनची असणारी ठाम आणि स्पष्ट भूमिका आम्ही परत एकदा आक्रमकपणे जाहीर करत आहोत, असेही सांगळे यांनी म्हटले आहे.



> चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी जवळील महानगरपालिकेचे खेळासाठी आरक्षित मैदान एका खाजगी संस्थेला हॉर्स रायडिंग साठी देण्याच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निर्णयाला आमच्या फेडरेशनचा सुरवाती पासून तीव्र आक्षेप आणि विरोध होता आणि आहे. मागील दोन दिवसापासून आमच्या या भूमिकेबद्दल काही राजकीय पक्षाच्या मंडळीकडून सोसायटी धारकांच्या मध्ये संभ्रम निर्माण करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आमच्या फेडरेशनची असणारी पूर्वीची भूमिका आता आक्रमकपणे मांडणार आहे. लोकशाही मार्गाने जे जे करणे शक्य आहे ते फेडरेशनकडून केले जाईल.
>
> **-संजीवन सांगळे,** अध्यक्ष- चिखली -मोशी -पिंपरी चिंचवड

## फेडरेशन अराजकीय संघटना...

**»आमचे फेडरेशन हे अराजकीय सहकारी संघटना असून, आमच्या फेडरेशनची पूर्वीपासूनच भूमिका आहे की, आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाच्या भूमिकेला समर्थन किंवा विरोध करत नाही. परंतु, मागील दोन दिवसापासून काही राजकीय पक्षाच्या मंडळींकडून आमच्या सोसायटीच्या सभासदांमध्ये संभ्रम निर्माण करून गैरसमज पसरवण्यात येत आहेत. सदर आरक्षित खेळाचे मैदान हे आमच्या मुला बाळांसाठी आमच्या वयोवृद्ध मंडळींच्यासाठी आणि आमच्या सर्व सभासदांसाठी महत्त्वाचे आहे आहे आणि ते खेळासाठीच राखीव होते आणि खेळासाठीच राखीव ठेवले पाहिजे ठेवले गेले पाहिजे, असे मागणीही सांगळे यांनी केली आहे.**

## सोसायटीधारकांच्या हक्कासाठी फेडरेशन आग्रही...

**»दरम्यान, या प्रकरणी आमदार महेश लांडगे, महानगरपालिकाचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासमोर हा मुद्दा मांडणार आहोत. त्यांनी यामध्ये हस्तक्षेप करून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांनी तथा प्रशासकांनी घेतलेला निर्णय रद्द करण्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. महापालिका प्रशासनाने ओला कचरा उचलणे, उपयोगकर्ता शुल्क रद्द करणे, कचरा संकलन केंद्र स्थलांतर करणे, पाण्याच्या प्रश्नाबाबत आमदार महेश लांडगे यांच्याकडे पाठपुरावा करून आंद्रा भामा आसखेडचे पाणी आणणे, डी.सी रुल मध्ये बदल करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. अनेक समस्या सोडवल्या आहेत.**

# विरोधी पक्षांची रणनीती आता काय असणार?




**भाजपने तीन महत्त्वाच्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीत मिळवलेला विजय दणदणीत असल्याने भाजपचे शीर्ष नेतृत्व असलेले पंतप्रधान हे राजकीयदृष्ट्या चतुर आणि लोकप्रिय आहेत, भाजप ही मतदारयादीच्या पाना-पानांवर लक्ष ठेवणारी, तितके मनुष्यबळ आणि साधनसामग्री असलेली आणि त्या सामग्रीचा व्यूहात्मक वापर करणारी यंत्रणा आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झालेले आहे.**



दुसरीकडे काहीजण विद्यमान सरकारच्या आर्थिक धोरणांवर आणि अंमलबजावणीवर ठोस टीका करत असले, तरी केंद्र सरकारविरुद्ध असंतोष नाही, हेही पुन्हा दिसलेले आहे... म्हणूनच यापुढे विरोधी पक्ष करणार काय, त्यांची रणनीती काय, हा प्रश्न आणखी धारदार झालेला आहे.

सरकारवर धड टीका करणेसुद्धा विरोधी पक्षांना जड जाते आहे, अशी सध्याची स्थिती. एक भाजपनेताच मध्यंतरी म्हणाला होता की काँग्रेस अगदी आक्रमक भाषा वापरते खरी, पण जे आधीपासून आमच्याविरुद्ध आहेत तेवढ्यांपर्यंतच पोहोचणारी ती भाषा ठरते. विधानसभा निवडणुकांत काँग्रेसची मत-टक्केवारी फार घटलेली नाही, अशी चर्चा होत असताना 'सेंटर फॉर पॉलिसी रीसर्च'ने केलेले विश्लेषण पाहा- ज्या तीन राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला तेथेही मत-टक्का घटला नाही हे खरेच, पण विरोधी पक्षांनी भाजपकडची मते खेचून आणण्याऐवजी भाजपच अद्यापही काँग्रेसविरोधी मतांच्या टक्केवारीत वाढ करण्यात यशस्वी होतो आहे. काँग्रेसविरोधी मते स्वतःकडे वळवण्यातले भाजपचे हे यश छत्तीसगडमध्ये ठळकपणे दिसले. त्या राज्यात काँग्रेसची टक्केवारी थोडीशीच घटली, पण भाजपच्या मत-टक्केवारीत घसघशीत १२ टक्क्यांच्या आसपास वाढ झाली. यातून एवढे तरी सिद्ध होते की, नव्याने मतदार न जोडता, त्याच त्या मतदारांपर्यंत काँग्रेस पोहोचते आहे. यामागचे कारण काय असावे? कारणे शोधताना उघड होणारी मुख्य समस्या अशी की, काँग्रेसच्या विचारसरणीत जो बदल आवश्यक आहे, त्याची गरजच काँग्रेसी वैचारिक धुरिणांना उमगलेली नाही. एरवीही डावे/ पुरोगामी वगैरे लोक समाजरचनेवर अवलंबून राहण्याचा आळशीपणा करतात, म्हणून तर वर्षानुवर्षे 'सर्वहारा' किंवा तत्सम समाजगटांची ऊर्जाच आपल्याला राजकीय बळ देईल, असे मानले गेले आणि म्हणून कधी दलित, कधी मुस्लीम वा अन्य अल्पसंख्याक, कधी जातीपाती यांचे राजकारण करण्यात आले. अमुक समाजगट राजकीयदृष्ट्या असाच वागणार, असे गृहीत धरणारे हे राजकारण होते. असल्या राजकारणातूनच जातगणनेच्या मागणीवर अवलंबून राहणे, ही यातूनच घडलेली ताजी चूक. जातगणना केल्यानंतर आम्ही विकासासाठी काय करणार, याचा स्पष्ट कृतीकार्यक्रम नसेल तर ही मागणी राजकीय ऱ्हस्वदृष्टीची ठरते. समाजरचनेवरच भिस्त ठेवणे म्हणजे मतदारांना केवळ 'विशिष्ट समाजाचा भाग' मानणे आणि एकेकट्या व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे असलेल्या सदसद्विवेकबुद्धीला विचारात न घेणे, हे नैतिकदृष्ट्या अयोग्य आहेच, शिवाय ते व्यावहारिकदृष्ट्याही चुकीचे ठरते.

भाजपने दलित, ओबीसी आणि काही प्रमाणात अनुसूचित जातींच्या मतदान-वर्तनामध्ये गेल्या काही वर्षांत जो बदल घडवून आणला, त्यातून हेच सिद्ध होते की मतदारांकडे समाजगट म्हणून न पाहाता निराळ्या पद्धतीने त्यांना आवाहन करता येते. भाजपचे आवाहन हे सरळसरळ हिंदुत्वाचे आहे, ते निव्वळ अस्मिताखोर आहे, असा आक्षेप यावर घेतला जाईल. पण ही अस्मिताखोरी राजकारणातून आलेली आणि राजकारणासाठी उपयुक्त ठरणारी असेल, याची काळजी भाजप घेतो... याउलट डावे ज्या अस्मितांना आवाहन करतात, त्या अस्मिता निव्वळ निसर्गदत्त आणि राजकारणाशी असंबद्ध असतात. उदाहरणार्थ या निकालांनंतर पुन्हा एकदा उठवण्यात आलेली 'उत्तर विरुद्ध दक्षिण' ही आवई पाहा. दक्षिण भारत आणि उत्तर भारत यांच्यामध्ये फरकाचे अनेक मुद्दे आहेत हे मान्यच. परंतु बौद्धिक-वैचारिक आव आणून त्या फरकांचे जे उदात्तीकरण काँग्रेस करते आहे, त्यातून काहीही साध्य होणार नाही- उलट काँग्रेसवर भेदभावाचा आरोप होण्याचा धोकाच यातून संभवतो. दक्षिण भारतातही धार्मिक वा जातीय तणाव आहेतच. अगदी केरळमध्येही हे तणाव आहेत. तमिळनाडूतला जातिभेद हा भारताच्या अन्य राज्यांइतकाच दमनकारी आहे.

## संपादकीय »

# मलिक नकोत

***इंग्रजीत 'यू कॅन नॉट हॅव केक अँड ईट इट टू' अशा अर्थाचा वाक्प्रचार आहे. म्हणजे तुम्हास केक हातातही हवा आणि खायचा पण आहे, असे दोन्ही एकाच वेळी साध्य करता येत नाही.***

अजितदादा पवार यांना आता देवेंद्र फडणवीस यांच्या पत्रास्त्राने या वाक्प्रचाराचा अर्थ लगेच लक्षात येईल. अजितदादांचे सर्व राजकारण केक हातातही ठेवायचा आणि खायचा देखील; असे दुहेरी पद्धतीने चालते. नवाब मलिक यांच्या पाठिंब्याच्या मुद्द्यावर गुरुवारी पत्र लिहून – आणि मुख्य म्हणजे ते प्रसिद्ध करून – फडणवीस यांनी ते उघडे पाडले. त्यामुळे अजितदादा यांस फडणवीस म्हणजे काही आपले काका नाहीत, याचीही जाणीव होईल. प्रश्न मलिक यांच्यावरील गंभीर आरोपांच्या सत्यासत्यतेचा नाही. ते सत्य आहेत असे मानून घेतलेल्या भूमिकेचा आहे. याची जाणीव फडणवीस यांनाही झाली, हे बरे झाले. उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडल्यानंतर आणि पक्षादेश शिरसावंद्य मानून एकनाथ शिंदे यांच्या सरकारात उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागल्यानंतर आज पहिल्यांदा फडणवीस यांनी 'स्वतःची' म्हणून एक भूमिका घेतली.

**संसदेतील कनिष्ठ सभागृह असलेल्या लोकसभेत ६ डिसेंबर रोजी दोन विधेयकांत सुधारणा स्वीकारण्यात आली. जम्मू काश्मीर आरक्षण (सुधारणा) विधेयक २०२३ आणि जम्मू काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक २०२३. पावसाळी अधिवेशनात ही दोन्ही विधेयके संसदेच्या पटलावर मांडण्यात आली होती. जम्मू काश्मीर आरक्षण (सुधारणा) विधेयकाअंतर्गत २००४ सालच्या जम्मू काश्मीर आरक्षण कायद्यात बदल करण्यात आले आहेत.**

# आरक्षण प्रस्तावा मागे राजकारण?

जम्मू काश्मीर पुनर्रचना कायदा २०१९ अंतर्गत जम्मू काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयकाअंतर्गत बदल करण्यात आले आहेत. जम्मू काश्मीर आरक्षण कायदा २००४ यात विद्यमान केंद्र सरकारने कमकुवत आणि वंचित घटक हे बदलून जम्मू काश्मीर केंद्र शासित प्रदेशाला 'इतर मागासवर्गीय' ठरवण्याचे अधिकार देण्यात येत असल्याचा उल्लेख केला आहे. जम्मू काश्मीर पुनर्रचना सुधारणा विधेयकात जम्मू काश्मीर विधानसभा म्हणजेच २०१९ साली अस्तित्वात आलेल्या केंद्रशासित प्रदेशातील विधानसभेच्या सात जागा वाढवण्यात आल्या असून पूर्वी नियोजित असलेल्या ८३ जागा आता ९० वर नेण्यात आलेल्या आहेत. एकूण भागांपैकी सात जागा या मागासवर्गीयांसाठी, नऊ जागा या अनुसूचित जातींसाठी राखीव असतील अशी सुधारणा विधेयकात तरतूद आहे. सुधारणा विधेयकानुसार नायब राज्यपालांना विस्थापित काश्मिरी




नागरिकांची विधानसभेत नेमणूक करता येणार असून त्यापैकी एक महिला असेल. पाकव्याप्त काश्मीरतून विस्थापित व्यक्तीची विधानसभेत नेमणूक अशी वेगळी तरतूद सुधारणा विधेयकात आहे. पाकव्याप्त काश्मिरातील नागरिकांसाठी २४ जागा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा एकूण ११४ जागांची तरतूद सुधारणा विधेयकात आहे. आरक्षणाचा फायदा खरोखरच वंचित घटकांना मिळणार आहे का, याचा प्राधान्याने विचार होणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांत दहशतवाद, हिंसाचार हीच काश्मीरची ओळख ठरली आहे. याव्यतिरिक्त तेथील सामाजिक प्रश्न फारसे कधी समोर आलेच नाहीत.

जम्मू काश्मीर लडाखच्या एकूण लोकसंख्येचा १२ टक्के लोकसंख्या ही गुज्जर, बकरवाल समुदायाची आहे. शेळी -मेंढी पालन हे या समुदायाच्या उत्पन्नाचे स्रोत आहेत. परंतु नवीन आरक्षण सुधारणा विधेयकामुळे त्यांच्या सामाजिक परिस्थितीवर राजकीय अन्याय झाल्याची दोन्ही समुदायांची भावना आहे. त्याचवेळी मुस्लीम धर्मीय असलेल्या गुज्जर आणि बकरवाल समुदायांनी प्रस्तावित विधेयकांच्या विरोधात निदर्शने केली. मात्र निषेधाचा सूर जम्मूच्या तवी नदीच्या पुलापुरताच मर्यादीत राहिला. दिल्लीश्वरांच्या कानी त्यांच्या व्यथा गेल्या असतीलही परंतु त्यांनी कानांवर हात ठेवले असावेत. हिंदू त्यांना स्वीकारत नाहीत आणि मुस्लीमही त्यांना स्वधर्मीय समजत नाहीत. वास्तविक हे दोन्ही समुदाय तसे भटके- शेळी, मेंढी, बकरी पालन करणारे. सरकारपेक्षा हा समाज आपल्या शेळ्या, बकरी आणि मेंढ्यांवर अधिक अवलंबून आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कांदा उत्पादक शेतकरी उतरले रस्त्यावर

## सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कांद्याचे भाव अचानक कोसळल्यामुळे संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतक-यांनी नाशिक पुणे मार्ग आडवून केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत सुमारे दीड तास रास्तारोको आंदोलन केले. बाजार समितीच्या सभापतींनी फेर लिलाव करण्याचे आश्वासन शेतक ऱ्यांना दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेतले.**



मात्र सभापतींनी सांगून सुद्धा व्यापारी फेरलिलाव करत नव्हते त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पुन्हा बाजार समितीच्या सभापतींच्या दालनाच्या बाहेर येत फेरलिलाव न करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या विरोधात आक्रमकपणा घेतला. त्यानंतर सभापती व सचिव यांनी कांदा लिलावाच्या ठिकाणी जाऊन व्यापाऱ्यांना लगेच फेरलिलाव चालू करण्याचे सक्त आदेश दिले. व्यापाऱ्यांनी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास फेर लिलाव सुरू केले त्यानंतरच शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये गुरुवारी कांद्याला चार ते साडेचार हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला होता. मात्र शुक्रवारी अचानक हा भाव निम्म्याने घसरत दोन ते अडीच हजार रुपये क्विंटल मिळू लागला. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी बाजार समिती मध्ये सुरू असणारे कांद्याचे लिलाव बंद पाडले. त्यानंतर पुणे नाशिक मार्ग आडवत केंद्र सर कारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यामुळे पुणे नाशिक मार्गावरती वाहतूक कोंडी झाली असल्याची माहिती पो नि भगवान मथुरे व पो नि देविदास ढुमणे यांना समजताच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आंदोलन स्थळी धाव घेतली आणि शेतक ऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र शेतकरी ऐकण्याच्या तयारीत नव्हते. त्यानंतर कांद्याचे भाव पाडणाऱ्या व्यापा-यांना येथे बोलवा आणि कांद्याचे भाव अचानक का कमी केले याचे त्यांनी उत्तर दिल्या शिवाय आम्ही येथून हटणार नाही असा पवित्रा संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी घेतला. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर व सचिव सतीश गुंजाळ यांनी कांदा व्यापाऱ्यांना आंदोलन स्थळी बोलून घेतले. रात्री अचानक केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी केली असल्यामुळे कांद्याचे भाव कोसळले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्यावर संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी तुम्ही आम्हाला अगोदर कळवले का नाही आम्ही कशाला कांदा आणला असता असा संतप्त सवाल करत कांद्याला कालच्या प्रमाणे भाव द्यावा अशी मागणी लावून धरली. त्यानंतर बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांची समजूत काढत कांद्याचे पुन्हा फेरलिलाव केले जातील असे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी दीड वाजता सुरू झालेला रस्ता रोको आंदोलन तीन वाजता मागे घेतले. सभापतींनी दिलेल्या आश्वासनावर कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा मार्केटमध्ये लिलावाच्या ठिकाणी आले. अर्धा एकतास उलटून गेलातरी व्यापारी फेर लिलावसुरू करत नव्हते त्यामुळे शेतकरी पुन्हा आक्र मक झाले आणि त्यांनी थेट सभापतींच्या दालनाच्या बाहेर व्यापाऱ्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली त्यानंतर सभापती शंकर खेमनर सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे चेअरमन प्रतापराव ओहळ सचिव सतीश गुंजाळ यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यां बरोबर कांदा लिलावाच्या ठिकाणी जात तात्काळ कांद्याचे फिरलेला सुरू करा असे सक्त आदेश दिले त्यानंतर अखेर शेतकऱ्यांच्या पुढे गुडघे टेकत व्यापाऱ्यांनी पुन्हा कांद्याचे फिरलेला सुरू केले 900 हजार रुपयांपासून तीन ते साडेतीन हजार रुपयापर्यंत शेतकऱ्यांच्या कांदाला भाव काढण्यात आला त्यानंतर शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. केंद्र सरकारने गुरुवारी रात्री निर्यात बंदी केली असल्याचे जाहीर केल्यानंतर बाजार समितीत विक्रीसाठी आलेल्या कांद्याचे भाव अचानक कोसळले. त्यामुळे संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत आलेल्या कांद्याला कमी भाव निघाले आहे. मात्र बाजार समितीत विक्रीसाठी आलेल्या कांद्याचे फेर लिलाव केले जातील आणि जोपर्यंत केंद्र सरकार कांद्याचे भाव वाढ वत नाही तो पर्यंत संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती बंद राहील त्यामुळे शेतक ऱ्यांनी आपला कांदा बाजार समितीमध्ये आणू नये असे आवाहन संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर व सचिव सतीश गुंजाळ यांनी केले आहे.

### कांद्याचे लिलाव बंद पाडले

संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती च्या आवारात कांदा लिलावाच्या ठिकाणी एका व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात अप शब्द वापरल्याने संतप्त शेतकऱ्यांनी त्या व्यापाऱ्याच्या कर्मचाऱ्याला पकडत जाब विचारला त्यानंतर त्यांनी माफी मागित ल्यानंतर या वादावर पडदा पडला. व्यापाऱ्यांनी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास फेर लिलाव सुरू केले त्यानंतरच शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये गुरुवारी कांद्याला चार ते साडेचार हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला होता. मात्र शुक्रवारी अचानक हा भाव निम्म्याने घसरत दोन ते अडीच हजार रुपये क्विंटल मिळू लागला. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी बाजार समिती मध्ये सुरू असणारे कांद्याचे लिलाव बंद पाडले.

# मलिक प्रकरणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची उडी!

## नवाब मलिक यांच्यामुळे महायुतीबाबत लोकांमध्ये संभ्रम

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या राज्यात राष्ट्रवादीचे आमदार नवाब मलिक यांच्याबद्दल चर्चा चालू आहे. वैद्यकीय कारणांमुळे जामीनावर तुरुंगाबाहेर आलेले नवाब मलिक गुरुवारी (७ डिसेंबर) विधीमंडळाच्या अधिवेशनात सहभागी झाले. विधानसभेत ते सत्ताधारी आमदारांबरोबर जाऊन बसल्याने मोठा गदारोळ झाला आहे. भाजपाने मलिक यांच्यावर देशद्रोहासह वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केले होते.**

आता तेच नवाब मलिक विधीमंडळात भाजपा नेत्यांच्या मांडीला मांडी लावून बसल्याने विरोधी पक्षांनी भाजपाला कोंडीत पकडलं आहे. परिणामी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची नाराजी व्यक्त केली. नवाब मलिक यांना महायुतीत घेता येणार नाही, अशा आशयाचं पत्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवलं आहे. नवाब मलिक सत्ताधारी बाकावर बसल्यामुळे शिवसेनेच्या शिंदे गटानेही नाराजी व्यक्त केली होती.

मलिक यांच्यामुळे महायुतीबाबत लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतं, असं वक्तव्य शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केलं आहे. अशातच



आपल्यात कोणतेही मतभेद नाहीत हे दर्शवण्याचा प्रयत्न महायुतीतले नेते करत आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल यांचा एकत्र फोटो प्रफुल्ल पटेल यांनी समाजमाध्यमांवर शेअर केला आहे. पटेल यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील धान आणि इतर पिकांसह कडधान्याच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण आणि पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी आणि शेतकऱ्यांना डीबीटीच्या माध्यमातून 25 हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर करावी, अशी मागणी राज्य शासनाकडे केली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना भेटून याविषयीचं निवेदनही त्यांना दिलं. या फोटोत सर्व नेते हसत असल्याचं दिसतंय. या फोटोद्वारे पटेल यांनी महायुतीत सर्वकाही आलबेल असल्याचं दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, असं म्हटलं जात आहे.

### 'नवाब'चा 'जवाब' द्या किंवा नका देऊ

प्रफुल्ल पटेल यांनी शेअर केलेला फोटो महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर शेअर केला आहे. तसेच कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की, इतका स्नेह संबंध आहे तर पत्र का लिहावं लागतं? सुहास्य वदन दाखवण्याची ही कोणती धडपड? 'नवाब'चा 'जवाब' द्या किंवा नका देऊ, पण तुम्ही घातलेल्या राजकीय ढोंगीपणाच्या 'नकाब'चा 'जवाब' मात्र तुम्हाला जनतेला द्यावाच लागेल. नाहीतर जनता अगदी योग्यवेळी त्यांना गृहीत धरणाऱ्यांना धडा शिकवेल!

# तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का

## » तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा यांची खासदारकी रद्द

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पैसे घेऊन प्रश्न विचारल्या प्रकरणात तृणमूल काँग्रेसच्या (TMC) खासदार महुआ मोईत्रा (MAHUA MOITRA) यांची लोकसभेतील (LOK SABHA) सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. पैसे घेऊन लोकसभेत प्रश्न विचारण्याच्या प्रकरणात संसदेच्या एथिक्स कमिटीने मोईत्रा यांची खासदारकी रद्द करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानंतर आता त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.**



### मोईत्रा यांच्यावर आरोप काय?

» 'पैसे घेऊन प्रश्न' विचारण्याच्या आरोपाबाबतच्या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्याची शिफारस समितीने केली होती. र्शन हिरानंदानी यांच्या रोख व्यवहार प्रकरणाच्या चौकशीची शिफारस भारत सरकारला करण्यात आली होती. या प्रकरणावर लोकसभेत जवळपास अर्ध्या तासाहून अधिक काळ चर्चा करण्याती आली. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी महुआ मोईत्रा यांना देखील बोलण्याची संधी देण्यात आली. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी म्हटले आहे की, मोइत्रा यांचे निकटवर्तीय समजले जाणारे देहद्राईने अदानी समूह आणि पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करण्यासाठी मोईत्रा आणि व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्यातील लाच व्यवहाराचे पुरावे सादर केले आहेत. महुआ मोइत्रा यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. निशिकांत दुबे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, अलीकडच्या काही दिवसांपर्यंत महुआ मोईत्रा यांनी लोकसभेत विचारलेल्या 61 प्रश्नांपैकी 50 प्रश्न अदानी समूहावर केंद्रित होते.

'पैसे घेऊन प्रश्न' विचारण्याच्या आरोपाबाबतच्या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्याची शिफारस समितीने केली होती. र्शन हिरानंदानी यांच्या रोख व्यवहार प्रकरणाच्या चौकशीची शिफारस भारत सरकारला करण्यात आली होती. या प्रकरणावर लोकसभेत जवळपास अर्ध्या तासाहून अधिक काळ चर्चा करण्याती आली. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी महुआ मोईत्रा यांना देखील बोलण्याची संधी देण्यात आली. खासदारकी रद्द झाल्यानंतर महुआ मोईत्रा यांनी म्हटलं की, मी अदानी मुद्द्यावर भाष्य केल्यामुळे माझं लोकसभेचं सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे. एथिक्स कमिटीसमोर माझ्याविरुद्ध कोणताही मुद्दा नव्हता, कोणताही पुरावा नव्हता. त्यांचा एकच मुद्दा होता की मी अदानीचा मुद्दा उपस्थित केला होता. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी म्हटले आहे की, मोइत्रा यांचे निकटवर्तीय समजले जाणारे देहद्राईने अदानी समूह आणि पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य करण्यासाठी मोईत्रा आणि व्यावसायिक दर्शन हिरानंदानी यांच्यातील लाच व्यवहाराचे पुरावे सादर केले आहेत. महुआ मोइत्रा यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. निशिकांत दुबे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, अलीकडच्या काही दिवसांपर्यंत महुआ मोईत्रा यांनी लोकसभेत विचारलेल्या 61 प्रश्नांपैकी 50 प्रश्न अदानी समूहावर केंद्रित होते.

दरम्यान, उद्योगपती हिरानंदानी यांनी शपथपत्रात कबूल केले आहे की, पंतप्रधान मोदींची प्रतिमा मलिन करण्यासाठी मोईत्रा यांनी गौतम अदानी यांना लक्ष्य केले. हिरानंदानी यांनी संसदेत प्रश्न विचारण्यासाठी तृणमूलच्या खासदाराला पैसे दिल्याचा आरोप आहे. यानंतर या प्रकरणाची एथिक्स कमिटीत सुनावणी झाली, मात्र तेथेही गदारोळ झाला. महुआसोबत समितीच्या बैठकीत उपस्थित असलेल्या विरोधी पक्षाच्या खासदारांनी समितीने वैयक्तिक प्रश्न विचारल्याचा आरोप केला होता. त्यानंतर त्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला. महुआला विचारण्यात आले की ती रात्री कोणाशी बोलते? नंतर महुआने असेही सांगितले की एथिक्स कमिटी तिला घाणेरडे प्रश्न विचारत होती आणि तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न झाला.

# माजी मुख्यमंत्री KCR बाथरुममध्ये पडले!

## » रुग्णालयात दाखल, तातडीने शस्त्रक्रिया करणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (FORMER TELANGANA CHIEF MINISTER K CHANDRASHEKAR RAO) यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. केसीआर (KCR) पाय घसरुन पडल्यामुळे त्यांना दुखापत झाल्याची माहिती मिळत आहे. हैदराबादच्या (HYDERABAD) यशोदा रुग्णालयात केसीआर यांना दाखल करण्यात आलं आहे.**



केसीआर काल (गुरुवारी) रात्री एरवल्ली येथील त्यांच्या फार्महाऊसवर पाय घसरुन पडले. आता त्यांच्यावर हिप रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया पार पडणार आहे. दरम्यान, तेलंगणातील विधानसभा निवडणुकीचे निकाल 3 डिसेंबर रोजी जाहीर झाले आहेत. काँग्रेसनं तेलंगणात बहुमत मिळवत सरकार स्थापन केलं असून दोनदा तेलंगणाचं मुख्यमंत्री पद भूषवलं आहे. पण, यंदा मुख्यमंत्रीपदाची हॅट्रिक करण्याची काँग्रेसनं संधी हिसकावून घेतली. केसीआर यांच्या मुलीनं ट्वीट करून केसीआर पाय घसरुन पडल्याची माहिती दिली आहे. त्यांनी ट्वीट करून सांगितलं की, बीआरएस सुप्रीमो केसीआर यांना किरकोळ दुखापत झाली असून ते सध्या रुग्णालयात तज्ज्ञांच्या देखरेखीखाली आहेत. पाठिंबा आणि शुभेच्छांमुळे वडील लवकरच बरे होतील. तुमच्या सर्वांच्या प्रेमाबद्दल धन्यवाद.

119 जागांच्या तेलंगणात 30 नोव्हेंबर रोजी मतदान झालं होतं. 3 डिसेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात काँग्रेसला दणदणीत विजय मिळाला आहे. केसीआर यांची मुख्यमंत्री बनण्याची हॅटट्रिक हुकली. 2013 मध्ये राज्याच्या स्थापनेपासूनच केसीआर सत्तेवर होते. या निवडणुकीत काँग्रेसनं 64 जागा जिंकल्या आहेत, तर बीआरएसनं 39 जागा जिंकल्या आहेत. भाजपनं 8 जागा जिंकल्या आहेत, तर इतरांनीही 8 जागा जिंकल्या आहेत.काँग्रेस नेते रेवंत रेड्डी यांनी गुरुवारी तेलंगणाच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यात सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी आणि प्रियांका गांधी उपस्थित होते.

# रेपो रेट 6.5 टक्क्यांवर कायम

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं (RESERVE BANK OF INDIA) पुन्हा एकदा रेपो रेट (RBI REPO RATE) जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तीन दिवसीय चलनविषयक धोरण आढावा बैठकीनंतर (MPC MEETING) RBI गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी सांगितलं की, समितीनं पुन्हा एकदा रेपो दरांत कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपो दर सध्या 6.5 टक्के आहे. मात्र, आता रिझर्व्ह बँक (RBI) आता यावर बारीक लक्ष ठेवणार असल्याचंही शक्तीकांत दास (SHAKTIKANTA DAS) यांनी सांगितलं आहे. 2023-24 या आर्थिक वर्षासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पाचव्या पतधोरण बैठकीत गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, "रेपो दर सध्या स्थिर राहील. आरबीआयच्या बैठकीत 6 पैकी 5 सदस्यांनी रेपो दर स्थिर ठेवण्याच्या निर्णयाला सहमती दर्शवली आहे. रिझर्व्ह बँकेचा 'WITHDRAWAL OF ACCOMMODATION' ही भूमिका कायम आहे. गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणाले की, महागाईचा दर 4 टक्क्यांच्या खाली आणण्यावर भर दिला जाईल. आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं की, 2023-24 या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादनाची वाढ 7 टक्के राहण्याचा अंदाज आहे. यापूर्वी आरबीआयनं 6.5 टक्के वाढीचा अंदाज व्यक्त केला होता.

# तुम्हें आईने की जरुरत नहीं; अमृता फडणवीसांचं नवं गाणं रिलीज!

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADNAVIS) यांच्या पत्नी आणि गायिका अमृता फडवणीस (AMRUTA FADNAVIS) यांची अनेक गाणी प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. नुकतेच त्यांचे एक नवे गाणे रिलीज झाले आहे. या गाण्याचं नाव "तुम्हें आईने की जरुरत नहीं" (TUMHEIN AAINE KI) असं आहे. अमृता फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करुन त्यांच्या या नव्या गाण्याची माहिती नेटकऱ्यांना दिली आहे. तुम्हें आईने की जरुरत नहीं" हे अमृता फडणवीसांचे नवे गाणे रिलीज झाले आहे. शब्बीर अहमद हे या गाण्याचे गीतकार आहेत. तसेच अमृता फडणवीस यांच्यासोबतच



मिट ब्रोज आणि पियुष मेहरोलिया यांनी देखील हे गाणं गायलं आहे.मिट ब्रोज यांनी या गाण्याला संगीत दिलं आहे. तसेच नीलोत्पल बोरा आणि पियुष मेहरोलिया हे या गाण्याचे म्युझिक प्रोड्युसर आहेत. हे गाणे झी म्युझिक कंपनीच्या युट्यूब चॅनलवरुन शेअर करण्यात आलं आहे. गाण्याला आतापर्यंत जवळपास 2,536 व्ह्यूज मिळाले आहेत. अमृता फडणीवस यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन "तुम्हें आईने की जरुरत नहीं" या त्यांच्या नव्या गाण्याचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओला त्यांनी कॅप्शन दिलं,"BREEZY AND BLISSFUL "तुम्हें आईने की जरुरत नहीं" गाणं रिलीज झाले आहे."

# खामकरच्या पोस्टनं वेधलं लक्ष

प्रसिद्ध कोरिओग्राफर फुलवा खामकर (PHULWA KHAMKAR) ही तिच्या नृत्यशैलीनं प्रेक्षकांची मनं जिंकते. फुलवा ही प्रसिद्ध लेखक अनिल बर्वे यांची मुलगी आहे. फुलवाचे वडिल अनिल बर्वे यांचे निधन होऊन काल 39 वर्ष झाली. फुलवानं तिच्या बाबांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केलेय तिनं या फोटोला दिलेल्या कॅप्शननं अनेकांचे लक्ष वेधले. फुलवानं अनिल बर्वे यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोला तिनं कॅप्शन दिलं, "बाबा...आज तुम्हाला जाऊन 39 वर्ष झाली. मी पाचवीमध्ये होते.सकाळपासून खूप धडधडत होतं.आई हॉस्पिटलमधून आली आणि तिने सांगितलं.बाबा गेले.मला फक्त आजोबांचा आक्रोश आठवतोय.आजी आणि आई खूप शांत होत्या! दारूमुळे माणूस इतका असहाय्य होऊ शकतो? एक अत्यंत प्रतिभावान,हुशार आणि जगाच्या पुढे असणारा माणूस दारूमुळे वयाच्या अवघ्या 36 व्या वर्षी जातो हे भयानक आहे! मग बाबा हा कप्पा मी पूर्णपणे बंद करुन ठेवला!" आजच्या पिढीला सुद्धा लेखक अनिल बर्वे माहीत आहे याचा खूप आनंद आम्हाला होतो.अनिल बर्वेंची आम्ही मुलं आहोत हा अभिमान सुद्धा आम्हाला आहे ज्यूलिएटचेडोळे,रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता, कोलंबस वाट चुकला, अकरा कोटी गॅलन पाणी, थँक यू मिस्टर ग्लाड, हमीदा बाई ची कोठी, स्टड फार्म, डोंगर म्हातारा झाला , पुत्र कामेष्टी, मी स्वामी या देहाचा, आकाश पेलताना.



# हेमांगीने सोशल मीडियावर व्यक्त केला संताप

हेमांगी कवी ही मराठी मनोरंजन विश्वातील चर्चेतील अभिनेत्री. हेमांगीने आजवर नाटक, सिनेमा, मालिका अशा विविध माध्यमांमध्ये प्रेक्षकांचं मनोरंजन केलंय. हेमांगी सोशल मीडियावर अनेक गोष्टींबद्दल व्यक्त होत असते. हेमांगीला सोशल मीडियावर एका नेटकऱ्याचा संतापजनक अनुभव आलाय. त्याबद्दल हेमांगीने इन्स्टाग्राम स्टोरीवर भाष्य करत तीव्र संताप व्यक्त केलाय. हेमांगीच्या एका फोटोवर नेटकऱ्याने विचित्र कमेंट केलीय. त्यामुळे हेमांगीने सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केलीय. हेमांगी लिहीते, "BIO मध्ये छत्रपती शिवाजी महाराज, गणपती बाप्पा, INDIAN ARMY! आणि प्रत्यक्षात वागताना??? असली माणसं आतून जनावरच असतात, ‘माणसा'चं कातडं घालून समाजात हिंडत असतात! हे कुठल्याही चित्रपट, नाटकापेक्षा जास्त घातक आहेत. चित्रपट काल्पनिक असतो पण अशी जनावरं आपल्या आजूबाजूला आहेत, खरीखुरी! वार करतात आणि पकडलेही जात नाहीत! माझ्यासाठी हा VIOLENCE च आहे!" पुढे हेमांगीने इन्स्टास्टोरीमध्ये स्क्रीनशॉट टाकल्याने नेटकऱ्याने कमेंट डिलीट केली. हे लक्षात येताच हेमांगी लिहीते, "WHILE EVERYONE IS ARGUING ABOUT IT.... जरा या माणसाचं BIO बघा! असल्या जनावरांचं काय करायचं? मी हे STORY मध्ये POST केल्यावर याने ही COMMENT DELETE केली, म्हणून ही STORY तुम्हांला दिसत नाहीए! चला, आपण आपल्या BIO मध्ये ज्यांचा उल्लेख केलाय त्यांची आठवण आली असावी! चांगलंय!" याविषयी अनेकांनी हेमांगीचं कौतुक केलं असुन नेटकऱ्याबद्दल संताप व्यक्त केलाय.

# लग्नाला यायचं तर ते कोडं सोडवावं लागणार

आमिर खानची मुलगी इरा खान ही सध्या तिच्या लग्नामुळे चर्तेत आहे. इरानं तिचा बॉयफ्रेंड नुपूर शिखरेसोबत गेल्या वर्षी एंगेजमेंट केली होती. आता ती नुपूरसोबत जानेवारी 2024 मध्ये लग्नगाठ बांधणार आहे. सध्या इरा आणि नुपूर लग्नापुर्वीचे विधी करत आहेत. काही दिवसांपुर्वी इराच्या केळवणाचे फोटोही सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. आता दोघेही त्यांच्या लग्नाच्या तयारी व्यस्त आहेत. आता इरा खान लग्नाच्या तयारीत व्यस्त आहे आणि तिने आता तिच्या लग्नाची पत्रिका पाठवण्यास सुरुवात केली आहे. इराने तिच्या मैत्रिणींना पाठवलेल्या लग्नाच्या कार्डावरील प्रतिक्रियाही शेअर केल्या आहेत. इरा खान-नुपूरच्या लग्नाला थोडेच दिवस शिल्लक आहेत. त्यात इरा खान-नुपूर यांनी मित्रांना लग्नाची पत्रिका पाठवण्यास सुरुवात केली आहे. आता सध्या या दोघांच्या लग्न पत्रिकेने सर्वांचे लक्ष वेधले आहे. इरा खानने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तिच्या लग्नाच्या पत्रिकेची झलक पाहायला मिळत आहे. इरा खान-नूपूर शिखरेची लग्नपत्रिका पाहून चाहतेही थोडे चक्रावले आहेत. इरा खान-नुपूर शिखरे यांनी आपल्या मित्रांना अनोख्या शैलीत लग्नाची निमंत्रण पत्रिका पाठवली आहेत. या लग्नपत्रिकेत एक कोडे पाठवले जे त्यांना कॅमेऱ्यासमोर सोडवायचे आहे.



# दक्षिण आफ्रिकेचा पेपर सोपा नाहीच!

## आफ्रिकन 'पंचप्राण' टीम इंडियाला धक्का देण्याच्या तयारीत!

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय संघ (INDIA VS SOUTH AFRICA) तिन्ही फॉरमॅटची मालिका खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत पोहोचला आहे. या आफ्रिकन दौऱ्यावर टीम इंडियाला तीन टी-20, तितकेच एकदिवसीय आणि दोन कसोटी सामने खेळायचे आहेत. या दौऱ्याची सुरुवात टी-20 सामन्यांनी होईल, ज्यामध्ये भारतीय संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादवकडे असेल. भारतीय संघाप्रमाणे दक्षिण आफ्रिकेचाही टी-20 मालिकेसाठी युवा खेळाडूंवर विश्वास आहे. यजमान संघात असे काही खेळाडू आहेत जे भारतीय संघासमोर आव्हान उभे करू शकतात. अशा पाच खेळाडूंबद्दल जाणून घेऊया...**



टी-20 मालिकेतील दक्षिण आफ्रिकेच्या कर्णधारपदाची धुरा एडन मार्करमच्या खांद्यावर असणार आहे. अशा परिस्थितीत मार्करमवर दुहेरी जबाबदारी असेल. 29 वर्षीय मार्करमचा टी-20 रेकॉर्ड खूपच प्रभावी आहे. मार्करमने 37 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये 1063 धावा केल्या आहेत, ज्यात 9 अर्धशतकांचा समावेश आहे. मार्करमने भारताविरुद्ध केवळ चार टी-20 सामने खेळले आहेत, ज्यात त्याने 110 धावा केल्या आहेत. मार्करमही उपयुक्त फिरकी गोलंदाज आहे. मार्करमला सामोरे जाणे भारतीय संघासाठी सोपे नसेल. दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा हा खेळाडू आपल्या फलंदाजीच्या जोरावर सामन्याचा निकाल बदलण्यात पटाईत आहे. क्लासेनची विकेट भारतीय संघासाठी खूप महत्त्वाची असेल. 32 वर्षीय क्लासेनने दक्षिण आफ्रिकेसाठी आतापर्यंत 41 टी-20 सामने खेळले असून 710 धावा केल्या आहेत. क्लासेनने T-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात चार अर्धशतके झळकावली आहेत आणि त्याची सरासरी 23.66 आहे. क्लासेनने भारताविरुद्धच्या 7 टी-20 सामन्यांमध्ये 210 धावा केल्या आहेत. या उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने 2023 च्या क्रिकेट विश्वचषकात चमकदार कामगिरी केली होती. कोएत्झीने 8 सामन्यात 19.80 च्या सरासरीने 20 विकेट घेतल्या आणि सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे. टी-20 मालिकेतही कोएत्झी दक्षिण आफ्रिकेच्या संघासाठी गेम चेंजर ठरू शकतो. कोएत्झीच्या उसळत्या चेंडूंबाबत भारतीय फलंदाजांना खूप काळजी घ्यावी लागणार आहे. कोएत्झीने केवळ तीन टी-20 आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याच्या नावावर केवळ तीन विकेट आहेत. डावखुरा वेगवान गोलंदाज मार्को जॅनसेनने 2023 च्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतही चमकदार कामगिरी केली आणि 9 सामने खेळून 17 बळी घेतले. जॅनसेन पॉवरप्लेमध्ये विकेट घेण्यात पटाईत आहे, त्यामुळे भारतीय सलामीवीरांना त्याच्याबाबत खूप काळजी घ्यावी लागेल. बॅटने लाँग शॉट्स मारण्याची क्षमताही जॅनसेनकडे आहे. 23 वर्षीय जॅनसेनने दक्षिण आफ्रिकेसाठी तीन टी-20 सामने खेळले असून 5 विकेट्स घेतल्या आहेत. टी-20 मालिकेत भारतीय वंशाचा फिरकी गोलंदाज केशव महाराजची भूमिकाही महत्त्वाची असणार आहे. केशवकडे मधल्या षटकांमध्ये धावगती नियंत्रित करण्याची तसेच विकेट घेण्याची क्षमता आहे.

### कर्णधारपदाची धुरा मार्करमच्या खांद्यावर

» टी-20 मालिकेतील दक्षिण आफ्रिकेच्या कर्णधारपदाची धुरा एडन मार्करमच्या खांद्यावर असणार आहे. अशा परिस्थितीत मार्करमवर दुहेरी जबाबदारी असेल. 29 वर्षीय मार्करमचा टी-20 रेकॉर्ड खूपच प्रभावी आहे. मार्करमने 37 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये 1063 धावा केल्या आहेत, ज्यात 9 अर्धशतकांचा समावेश आहे. मार्करमने भारताविरुद्ध केवळ चार टी-20 सामने खेळले आहेत, ज्यात त्याने 110 धावा केल्या आहेत. मार्करमही उपयुक्त फिरकी गोलंदाज आहे. मार्करमला सामोरे जाणे भारतीय संघासाठी सोपे नसेल.

# तु गर्विष्ठ आणि लायकी नसलेला व्यक्ती : श्रीसंथ

## गंभीरने श्रीशांतच्या चेंडूंवर षटकार आणि चौकार मारले

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या दिग्गजांमध्ये लिजेंड्स लीग क्रिकेट (LLC) खेळले जात आहे. या स्पर्धेत गुजरात जायंट्स आणि इंडिया कॅपिटल्स यांच्यात सामना झाला. या सामन्यात श्रीशांत गुजरातकडून गोलंदाजी करत होता आणि गौतम गंभीर इंडिया कॅपिटल्सकडून फलंदाजी करत होता. गौतम गंभीरने श्रीशांतच्या काही चेंडूंवर शानदार षटकार आणि चौकार मारले आणि त्यानंतर त्यांच्या काळातील या दोन आक्रमक क्रिकेटपटूंमध्ये वाद निर्माण झाला.**





या दोन माजी भारतीय क्रिकेटपटूंमध्ये बराच वाद झाला. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि क्रिकेट चाहत्यांमध्ये चर्चा सुरू झाली. दरम्यान, गुरुवारी सकाळी श्रीसंतने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून एक लाइव्ह व्हिडिओ केला, ज्यामध्ये त्याने सामन्यादरम्यान गौतम गंभीरसोबत झालेल्या भांडणाबद्दल सांगितले. श्रीशांतने सांगितले की, गंभीरने खेळपट्टीवर फलंदाजी करताना वारंवार त्याला शिवीगाळ केली, त्याच्याबद्दल अपशब्द वापरले आणि त्याला फिक्सर म्हणत त्याचा अपमान केला. तू खेळाडू आणि भाऊ म्हणून सर्व मर्यादा ओलांडल्या आहेस. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तु लोकांचं प्रतिनिधित्व करतोस. तरीही, तू प्रत्येक क्रिकेटपटूशी वाद घालत राहतोस. तुझी अडचण आहे तरी काय? मी फक्त हसलो आणि निरीक्षण केलं आणि तु मला फिक्सर म्हणून लेबल लावलास? गंभीरपणे? तु सर्वोच्च न्यायालयाच्या वर आहेस का? तुला अशा पद्धतीने बोलण्याचा आणि तुला वाटेल ते बोलण्याचा अधिकार नाही. तू पंचांना शाब्दिक शिवीगाळ केलीस आणि तरीही तु हसत बोलतोस? तु एक गर्विष्ठ आणि पूर्णपणे लायकी नसलेला व्यक्ती आहेस. ज्यांनी तुला पाठिंबा दिला त्यांच्याबद्दल कोणत्याही प्रकारचा आदर नाही. कालपर्यंत, मी नेहमीच तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा आदर करत असे. तथापि, तु "फिक्सर" हा अपमानास्पद शब्द फक्त एकदाच नाही तर सात किंवा आठ वेळा वापरलास. तु पंच आणि माझ्यासाठी एफ-शब्द वापरून मला चिथावणी देण्याचा प्रयत्न केलास मी जे सहन केले. ते ज्यानं अनुभवलं आहे तो तुम्हाला कधीही माफ करणार नाही. खोलवर, तुला माहिती आहे की तू जे बोललास आणि केले ते चुकीचे होतं. मला खात्री आहे देव देखील तुम्हाला माफ करणार नाही.

### तु न्यायालयाच्या वर आहेस का?

» श्रीशांतने आपल्या व्हिडिओमध्ये म्हटले आहे की, "प्रत्येक चॅनलवर जाऊन पुन्हा पुन्हा सांगण्याऐवजी, मी थेट येऊन सर्व काही एकाच वेळी स्पष्ट करणे चांगले आहे. अर्थात तो (गौतम गंभीर) जिथून आला आहे, त्याच्याकडे एक उत्कृष्ट पीआर टीम आहे, ज्यावर खूप पैसे खर्च करतात. मी एक सामान्य व्यक्ती आहे. मी माझ्या कुटुंबाच्या आणि माझ्या चाहत्यांच्या पाठिंब्याने माझी लढाई एकटाच लढू शकतो. तू खेळाडू आणि भाऊ म्हणून सर्व मर्यादा ओलांडल्या आहेस. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तु लोकांचं प्रतिनिधित्व करतोस. तरीही, तू प्रत्येक क्रिकेटपटूशी वाद घालत राहतोस. तुझी अडचण आहे तरी काय? मी फक्त हसलो आणि निरीक्षण केलं आणि तु मला फिक्सर म्हणून लेबल लावलास? गंभीरपणे? तु सर्वोच्च न्यायालयाच्या वर आहेस का? तुला अशा पद्धतीने बोलण्याचा आणि तुला वाटेल ते बोलण्याचा अधिकार नाही. तू पंचांना शाब्दिक शिवीगाळ केलीस आणि तरीही तु हसत बोलतोस? तु एक गर्विष्ठ आणि पूर्णपणे लायकी नसलेला व्यक्ती आहेस. ज्यांनी तुला पाठिंबा दिला त्यांच्याबद्दल कोणत्याही प्रकारचा आदर नाही.